follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

www.rajdand.com

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

२५ वर्षे विश्वासार्हतेची

✻ RNI Regd. No. 72105/99 ✻ वर्ष २५, अंक १९० सातारा, सोमवार, १८ मार्च, २०२४ ✻ पाने ८ (सुप्रभात) किंमत रू ५/-

## तर महाराष्ट्रातील निवडणुका बॅलेट पेपरवर होणार

**मुंबई :** : देशातील लोकसभा निवडणूक २०२४ चा कार्यक्रम केंद्रीय निवडणूक आयोगाद्वारे जाहीर करण्यात आला असूनमहाराष्ट्रात१९ एप्रिल ते २० मे या कालावधीत एकूण पाच टप्प्यांमध्ये निवडणूक होणार आहे. या निवडणुकीची आदर्श आचारसंहिता शनिवारपासून लागू झाली आहे.महाराष्ट्रातयंदाची निवडणूक विविध मुद्द्यांनी गाजणार आहे. यामध्ये मराठा आरक्षणाचा मुद्दाही

महत्त्वाचा ठरण्याची शक्यता आहे. राजकीय नेत्यांना आपली ताकद दाखवून देण्यासाठी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी महाराष्ट्रातील सर्व ४८ मतदारसंघांत समाजातील तरुणांनी शेकडो उमेदवारी अर्ज दाखल करावेत, असं आवाहन केलं आहे. उमेदवारांची संख्या प्रचंड प्रमाणात असेल तर ईव्हीएमवर निवडणुका घेणं कठीण होणार आहे. अशातच आज राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रधान सचिव एस. चोक्कलिंगम यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत ईव्हीएमच्या क्षमतेबाबत माहिती दिली आहे.

ईव्हीएमसंदर्भात विचारण्यात आलेल्या प्रश्नावर बोलताना एस. चोक्कलिंगम म्हणाले की, एका मतदारसंघात ४०० उमेदवारांहून अधिक उमेदवारांनी निवडणुकीसाठी अर्ज दाखल केल्यास आपल्याला बॅलेट पेपरवर निवडणूक घ्यावी लागेल.

कारण सध्याच्या स्थितीत ईव्हीएमची तांत्रिक क्षमता ४०० उमेदवारांपर्यंतची आहे, अशी माहिती त्यांनी दिली आहे. ईव्हीएमबाबत कशी आहे यंत्रणेची सज्जता?राज्यामध्ये सर्व लोकसभा मतदारसंघांच्या निवडणुकीमध्ये ईव्हीएम- व्हीव्हीपॅट (EVM-VVP-T) चा वापर करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्यात एकूण २.४७ लाख बॅलेट युनिट (Bus), एकूण १.४५ लाख कन्ट्रोल युनिट(CUs) आणि एकूण १.५३ लाख व्हीव्हीपॅट(VVP-Ts)यंत्रणेचा वापर करण्यात येणार आहे. या सर्व यंत्रांची प्रथम स्तरीय तपासणी (First Level Checking) पूर्ण करण्यात आली आहे.

### निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांची माहिती



निवडणूक मतदान यंत्रांच्या संदर्भात मतदारांमध्ये जागृती आणि विश्वासार्हता निर्माण व्हावी या हेतूने मोठ्या प्रमाणात जनजागृती कार्यक्रम दि.२९ डिसेंबर २०२३ ते दि २९ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत राबवण्यात आला. सर्व जिल्ह्यांमध्ये गाव पातळीवर मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून प्रत्यक्ष मतदान यंत्रांवर कसे मतदान करता येते तसेच ही प्रक्रिया कशी सुरक्षित आहे याची जनतेला माहिती देण्यात आली.

या जनजागृतीचा कार्यक्रम यशस्वी ठरला असून जनतेने या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात सक्रिय सहभाग घेतला आहे, अशी माहिती निवडणूक आयोगाकडून देण्यात आली आहे.महाराष्ट्रात पाच टप्प्यात होणार मतदानभारत निवडणूक आयोगाने दिनांक १६ मार्च, २०२४ रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक सन २०२४ चा कार्यक्रम जाहीर केला आहे. महाराष्ट्रामध्ये एकूण ४८लोकसभा मतदारसंघ आहेत. या मतदारसंघासाठी एकूण पाच टप्प्यांमध्ये मतदान घेण्यात येणार आहे.

पहिल्या टप्प्यात विदर्भातील ०५ लोकसभा मतदारसंघामध्ये दिनांक १९ एप्रिल रोजी मतदान घेण्यात येणार आहे.यासाठीचे नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याची प्रक्रिया दिनांक २० मार्चपासून सुरु होईल. दुसऱ्या टप्प्यात विदर्भ व मराठवाड्यातील ०८ लोकसभा मतदारसंघामध्ये दिनांक २६एप्रिल रोजी मतदान घेण्यात येणार असून यासाठीचे नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याची प्रक्रिया दिनांक २८ मार्चपासून सुरु होईल.

तिसऱ्या टप्प्यात पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व कोकणातील ११ लोकसभा मतदारसंघामध्ये दिनांक ०७ मे रोजी मतदान घेण्यात येणार असून यासाठीचे नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याची प्रक्रिया दिनांक १२एप्रिलपासून सुरु होईल. चौथ्या टप्प्यात खान्देश, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील ११ लोकसभा मतदारसंघामध्ये दिनांक १३ मे रोजी मतदान घेण्यात येणार असूनयासाठीचे नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याची प्रक्रिया दिनांक १८एप्रिलपासून सुरु होईल.

पाचव्या टप्प्यात खान्देश व कोकणातील १३ लोकसभा मतदारसंघामध्ये दिनांक २० मे रोजी मतदान घेण्यात येणार असून यामध्ये मुंबई व ठाण्यातील मतदारसंघांचा सुध्दा समावेश आहे. यासाठीचे नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याची प्रक्रिया दिनांक २६ एप्रिलपासून सुरु होईल. मतमोजणी दिनांक ०४ जून रोजी होणार आहे.

### महत्त्वाचे

#### अमरावती जिल्ह्यात २० दिवसांमध्ये २६३० मोतीबिंदू शस्त्रक्रिया पूर्ण



**अमरावती -** राष्ट्रीय अंधत्व व दृष्टी क्षीणता नियंत्रण कार्यक्रमांतर्गत १९ फेब्रुवारी ते ९ मार्चपर्यंत जिल्ह्यात मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये जिल्ह्यात मोतीबिंदू असलेल्या जवळपास २६३० ज्येष्ठ नागरिकांची शस्त्रक्रिया करण्यात आल्याची माहिती जिल्हा सामान्य रुग्णालय येथील नेत्र विभागाने दिली.

राष्ट्रीय अंधत्व व दृष्टी क्षीणता नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात मोतीबिंदूचा त्रास असलेल्या जवळपास ३ हजार रुग्णांची शस्त्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट आरोग्य विभागाला देण्यात आले होते. सुरुवातीला ही मोहीम १९ फेब्रुवारी ते ४ मार्चपर्यंत राबविण्याचे निर्देश दिले होते; परंतु यानंतर ९ मार्चपर्यंत या अभियानाला मुदतवाढ देण्यात आली होती.

मोतीबिंदूचा त्रास हा प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिकांमध्ये दिसून येत असल्याने ही मोहीम ५० वर्षांवरील नागरिकांसाठी राबविण्यात आली होती. जिल्ह्यात मोतीबिंदू शस्त्रक्रिया या जिल्हा सामान्य रुग्णालय ( इर्विन ) या एकमेव शासकीय रुग्णालयात तसेच जिल्ह्यातील काही खासगी रुग्णालयांमध्येदेखील मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यामुळे २० दिवसांमध्ये २ हजार ६३० शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात यश आल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली.

मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोहीम ९ मार्चपर्यंत राबविण्यात आली. यासाठी जिल्ह्याला ३ हजार शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट दिले होते. यामध्ये २ हजार ६३० शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून जवळपास ८८ टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले.

## शिवाजी पार्कातून शरद पवार कडाडले

**मुंबई :** देशाची परिस्थिती बदलण्याची गरज आहे. आपण सर्वांनी एकत्र येऊन देशाची परिस्थिती बदलली पाहिजे. देशात मोदी की गॅरंटी चालणार नाही, असा हल्लाबोल शरद पवारांनी केला आहे.

राहुल गांधींच्या भारत जोडो न्याय यात्रेचा (इहरीरीं गेवे छ्रू धरीेर) आज शिवाजी पार्क येथे समारोप होत आहे. या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीकडून जाहीर सभा आयोजित करण्यात आली. लोकसभा निवडणुकीचे रणशिंग इंडिया आघाडीने या सभेतून फुंकले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी यावेळी मोदी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

शरद पवार म्हणाले की, राहुल गांधींचे स्वागत करण्यासाठी आपण येथे आलोय. भारत जोडो न्याय यात्रेच्या माध्यमातून राहुल गांधी (ठर्हीश्र ऋ्रपवहळ) देशातील लाखो लोकांना भेटले. आजच्या सभेला इतक्या मोठ्या संख्येने लोकं उपस्थित आहेत. याचे एकमेव कारण म्हणजे देशात सध्या जी परिस्थिती आहे . यात बदल करण्याची गरज आहे. हा बदल आपण सर्व जण एकत्र येऊन आणू शकतो.

ज्या सरकारने जनतेला वेगवेगळे आश्वासन देऊन फसवले. त्या सरकारला हटवण्यासाठी आपल्याला ज्या दिवशी मतदानाची संधी मिळेल, त्या दिवशी आपल्याला पाऊल उचलावे लागेल. आपण पाहतोय की ज्या लोकांच्या हातात सत्ता आहे. त्यांनी देशाला अनेक आश्वासने दिले. शेतकऱ्यांना, कामगारांना, तरुणांना, महिलांना, दलित आणि आदिवासी जनेतला अनेक आश्वासने दिली होती. मात्र कुठलेच आश्वासन पूर्ण केले नाही.

जे लोक आश्वासन देतात आणि पूर्ण करत नाहीत, त्यांच्याविरोधात आपल्याला एकत्र यायला हवे. गेल्या काही दिवसांपासून आपण टीव्हीवर एक गोष्ट ऐकतोय, मोदी की गॅरंटी. पण ही गॅरंटी चालणार नाही. या गॅरंटीत सिक्युरिटी नाही. त्यामुळे चुकीची गॅरंटी देत, चुकीचे आश्वासन देत त्यांनी भरकटवण्याचा प्रयत्न केला. दबाबतंत्राविरोधात आपल्याला लढलं पाहिजे.

## १६ वर्षानंतर आरसीबीनं जिंकला चषक




**मुंबई :** रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुसाठी आजचा दिवस (१७, मार्च २०२४, रविवार) अतिशय खास आहे. स्मृती मंधानाच्या नेतृत्वातील आरसीबीने १६ वर्षांचा चषकाचा दुष्काळ संपवला आहे. महिला प्रिमियर लीग स्पर्धेत आरसीबीने दिल्लीचा पराभव करत चषकावर नाव कोरलेय. आरसीबीसाठी विराट कोहलीला जे जमलं नाही, ते स्मृती मंधानाने करुन दाखवलं आहे. १६ वर्षानंतर आरसीबीनं चषकावर नाव कोरलेय. फायनलमध्ये आरसीबीने दिल्लीचा आठ विकेटनं पराभव केला.

महिला प्रीमियर लीग स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दिल्ली कॅपिटल्सनं प्रथम फलंदाजी करताना ११३ धावांपर्यंत मजल मारली. दिल्लीने आरसीबीसमोर ११४ धावांचे आव्हान ठेवलं होतं. स्मृती मंधानाच्या आरसीबीने हे आव्हान आठ विकेटच्या मोबदल्यात सहज पार केले. आरसीबीसाठी स्मृती मंधाना हिने ३१, सोफी डिवाइनने ३२ आणि एलिस पेरी हिने नाबाद ३५ धावांची खेळी केली.

शानदार सुरुवातीनंतर दिल्लीचा डाव कोसळला -

दिल्लीनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दिल्लीच्या सलामी फलंदाजांनी शानदार सुरुवातही केली. शेफाली वर्मा आणि मेग लैनिंग यांनी दिल्लीला जबरदस्त सुरुवात करुन दिली. दोन्ही फलंदाजांनी पहिल्या ६ षटकात दिल्लीची धावसंख्या ६० पर्यंत पोहचवली होती. सहा षटकानंतर दिल्ली एकवेळ बिनबाद ६० अशा भक्कम स्थितीमध्ये होती. पण त्यानंतर आरसीबीच्या गोलंदाजांनी कमबॅक केले. एकापाठोपाठ एक फलंदाजांना तंबूत पाठवलं. आरीसीबीच्या गोलंदाजीसमोर दिल्लीचे फलंदाज फेल ठरले. बिनबाद ६० अशा सुस्थितीत असणारा दिल्लीचा संपूर्ण संघ ११३ धावांत गारद झाला. आरसीबीसाठी श्रेयंका पाटील हिने ४ विकेट घेतल्या. तर सोफी मोलिनक्स हिने ३ फलंदाजांना तंबूत पाठवलं. सोफी मोलिनक्स हिने एकाच षटकात दिल्लीच्या तीन फलंदाजांना तंबूत पाठवलं. त्यानंतरच दिल्लीची फलंदाजी ढेपाळली.

दिल्लीने दिलेल्या ११४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना आरसीबीची सुरुवात अतिशय संथ राहिली. पहिल्या षटकात आरसीबीला फक्त २५ धावाच करता आल्या. आरसीबी पुन्हा फायनलमध्ये पराभवाचा सामना करणार का? असाच प्रश्न चाहत्यांना सतावत होता. पण त्याचवेळी स्मृती मंधाना आणि सोफी डिवाइन यांनी गियर बदलला अन् वेगानं धावा काढल्या. कर्णधार स्मृती मंधाना हिने ३९ चेंडूमध्ये तीन चौकारांच्या मदतीने ३१ धावांची खेळी केली. सोफी डिवाइन हिने २७ चेंडूमध्ये पाच चौकार आणि एका षटकारांच्या मदतीने ३२ धावा जोडल्या. एलिस पेरी हिने ३७ चेंडूमध्ये चार चौकारांच्या मदतीने नाबाद ३५ धावा केल्या.

## होळीचा उत्साह, रेल्वेगाड्या ट्रॅव्हल्समध्ये हाऊसफुल गर्दी

**नागपूर:** होळीला अजून सात दिवसांचा कालावधी असला तरी रेल्वे गाड्या आणि खाजगी प्रवासी बसमध्ये प्रवाशांची गर्दी ओसंडून वाहत आहे. दिल्ली आणि मुंबई मार्गावरील रेल्वे गाड्यांमध्ये लांबलचक प्रतीक्षा यादी बघायला मिळत आहे. पुढच्या दोन-तीन दिवसांनंतर गाड्यांमध्ये पाय ठेवायला जागा मिळते की नाही, अशी स्थिती आहे.-ऊत्तएठढखडएचएछढविशेष म्हणजे, अनेक जण होळी व धुळवड आपल्या गावी जाऊन नातेवाइकांसोबत साजरी करतात. हे लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने देशभरात आधी ११२ आणि मध्य रेल्वेने नंतर १२ स्पेशल ट्रेन चालविण्याचा निर्णय घोषित केला आहे. मात्र, गाड्या वाढल्या तरी प्रवाशांची गर्दी एवढी जास्त आहे की या गाड्यांमध्येही आरक्षण मिळेनासे झाले आहे. दिल्ली मार्गावरील गाड्यांमध्ये तर जनरल डब्यातही प्रचंड गर्दी आहे. १२७२१ दक्षिण एक्स्प्रेसमध्ये स्लीपर आणि थर्ड एसीचे तिकीट मिळेनासे झाले आहे. १२६१५ जीटी एक्स्प्रेसमध्ये स्लीपर श्रेणीची तशीच अवस्था आहे. १२६२१ तामिळनाडू एक्स्प्रेसमध्ये स्लीपर आणि सेकंड एसीचे तिकीट देणे बंद करण्यात आले आहे. २२६९१ राजधानी एक्स्प्रेसच्या सर्व श्रेणीतील तिकीट बुक झालेले आहेत. १२२३ तेलंगणा एक्स्प्रेसची स्थितीही काहीशी अशीच आहे.मुंबई मार्गावर धावणाऱ्या १२१४० सेवाग्राम एक्स्प्रेसमध्ये प्रचंड गर्दी आहे.

## पर्यटन, वारसास्थळ पिक्चरमध्ये !

### शासनाच्या जागांवर विनामूल्य चित्रीकरणाची परवानगी

**मुंबई :** सिनेसृष्टीच्या हितासाठी महाराष्ट्र सरकारने एक नवे पाऊल उचलत शासनाच्या नियंत्रणाखालील जागांवर मोफत चित्रीकरणाच्या परवानगीला मान्यता दिली आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाने एका अधिसूचनेद्वारे या संदर्भातील माहिती दिली.



राज्य सरकारच्या नियंत्रणाखालील क्षेत्रात चित्रीकरणासाठी परवानगी मागण्यासाठी मोठ्या प्रमाणात अर्ज करण्यात येतात. ही बाब लक्षात घेऊन चित्रपट निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारी जागांवरील चित्रीकरणासाठी कोणतेही शुल्क न आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आंध्र प्रदेश आणि राजस्थानप्रमाणे महाराष्ट्रातही शासकीय जमिनीवर विनामूल्य चित्रीकरण करता येणार आहे.

चित्रपट निर्मिती केंद्र करण्याचे स्वप्न

मनोरंजन क्षेत्राला चालना देण्यासोबतच महाराष्ट्राला जागतिक चित्रपट निर्मिती केंद्र बनविण्याच्या दृष्टीनेही हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

या अंतर्गत मराठीसह देश-विदेशांतील चित्रपट, मालिका, माहितीपट व जाहिरातींना मोफत चित्रीकरण करता येईल.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी निर्मात्यांना अर्ज करणे बंधनकारक आहे. यासाठी एक खिडकी योजनेतून जाहिरातींसाठी ४० हजार रुपये, मालिकेसाठी एक लाख रुपये आणि चित्रपटासाठी अडीच लाख रुपये अनामत रक्कम घेण्यात येईल.

यामध्ये काही कालावधीनंतर बदल करण्याचे अधिकार संबंधित विभागांकडे असतील. शासकीय नियंत्रणाखालील गोरेगाव येथील दादासाहेब फाळके चित्रनगरी, कोल्हापूरमधील चित्रनगरी तसेच भविष्यात नव्याने होणाऱ्या चित्रनगरीस ही योजना लागू राहणार नसल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

चित्रीकरणाच्या वेळी सरकारी संस्था तसेच कार्यालयांच्या नियमित कामकाजात अडथळा येणार नाही, तसेच कायदा व सुव्यवस्थेचे पालन करण्याची जबाबदारी निर्मिती संस्थेवर राहील.चित्रपट उद्योगाची वाढ, पर्यटनाला चालना देणे, सांस्कृतिक वारसा जतन करणे आणि राज्यातील सामाजिक-आर्थिक विकासाला गती देण्यासाठी सरकारचे हे पाऊल महत्त्वपूर्ण असल्याचे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे. देशातील उर्वरित भागांच्या तुलनेत मुंबईमध्ये ५० टक्के अधिक चित्रपट व रोजगार निर्मिती होत आहे. मुंबईत साधारणपणे ५०० निर्मितीसंस्था, २५० चित्रपटगृहे आहेत.

# सातारा जिल्ह्यातून लोकसभेसाठी पुसेसावळीच्या सीमा पोतदार रिंगणात ?

**भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री धैर्यशील कदम यांच्याच पुसेसावळी गावच्या माझी महिला सरपंच सीमा पोतदार यांनी निवडणूक रिंगणात उतरण्याची जिद्द ठेवले आहे त्यामुळे चर्चेला चांगलेच उधाण आलेले आहे.**



**सातारा :** महिला सबलीकरण व नारी शक्ती अशा गोंडस नावाने महिला वर्गाला सक्षमीकरण करण्याची मोहीम आखली जात आहे. त्याचे स्वागत आहे. पण लोकसभा निवडणुकीत कर्तबगार महिलांना संधी देऊन त्यांच्या बुद्धीमतेचा वापर देशाचे कायदा व सुव्यवस्था राखण्यात होऊ शकतो. पण, आजही पुरुषप्रधान संस्कृतीमुळे महिलांना संधी मिळत नाही. ही संधी मिळवण्यासाठी खटाव तालुक्यातील पुसेसावळी येथील सौ सीमा पोतदार यांनी लोकसभा निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केलेली आहे .त्यांच्या या धाडसाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सातारा जिल्हा हा क्रांतिकारकांचा जिल्हा आहे. या ठिकाणी सर्वसामान्य महिलांना संधी मिळावी. त्यांच्या बुद्धिमत्तेचा उपयोग हा साताऱ्च्या विकासासाठी व्हावा. यासाठी स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेब यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेची निर्मिती केली होती. दुर्दैवाने सामान्य महिलांची व्याख्या पूर्णपणे बदलून गेलेले आहे. घराणेशाही चा उगम करण्यामध्ये ज्या नेत्यांनी सिंहाचा वाटा उचललेला आहे. आज अशा नेत्यांची राजकीय अवस्था बिकट झालेले आहे. आजही घराणेशाही पुरस्कृत नेते म्हणून त्यांची ओळख आहे. त्याला छेद देण्याचे काम ग्रामीण भागातून सीमा पोतदार यांच्यासारख्या महिलेंकडून होत आहे. ही अभिमानाची बाब आहे.

वास्तविक पाहता सर्वसामान्य माणसांना भेडसावणारी महागाई, महिलांना चूल आणि मुल या पलीकडे दृष्टिकोन नाही. असा काहीचा समज आहे. एवढेच नव्हे तर काही महिलांना काही कारणांमुळे लग्नानंतर नांदवले जात नाहीत. त्यांना घटस्फोट दिला जातो. त्यांना आयुष्यभर एकाकी जीवन जगावे लागते. अशा महिलांसाठी काहीतरी करून दाखवण्याची जिद्द पोतदार यांची असल्याने त्यांनी सातारा किंवा माढा लोकसभा मतदारसंघातून अर्ज दाखल करणार असल्याचे सांगितले आहे.

बारावीपर्यंत शिक्षण झालेल्या सीमा पोतदार यांचे माहेर माण तालुक्यातील मार्डी हे आहे तर खटाव तालुक्यातील पुसेसावळी हे सासर आहे. यापूर्वी पुसेसावळी नगरीचे सरपंच म्हणूनही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून सक्षमरित्या काम केलेले आहे. त्यांना सार्वजनिक जीवनाचा अनुभव आहे. त्यामुळे समाजातील वाढती बेरोजगारी कमी करणे, गुंडशाहीला कायद्याच्या चौकटीतच बंदिस्त करणे, वाढत्या महागाईमुळे अनेकांना जीवन बदलून गेलेले आहे. त्यांना महागाई कमी करून दिलासा दिला तर खऱ्या अर्थाने गोरगरीब हे दोन वेळचे पोटभर जेवण करू शकतात. युवा पिढी व्यसनेच्या आहारी गेलेले आहेत. त्यांच्यामुळे कुटुंब उध्वस्त होत आहेत. त्यांना सावरण्याचे काम करावे लागणार आहे. यासाठी आपण झटणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

धनगर व मराठा आरक्षणाचा प्रश्न मिटावा त्यातून सर्वांना संधी मिळावी यासाठीही संसदेमध्ये आवाज उठवणार आहे. असे ही त्यांनी स्पष्ट केले. ग्रामीण भागातून आलेल्या या महिलेच्या खूप आशा आकांक्षा आहेत .परंतु प्रस्थापित वर्ग त्यांना स्वीकारणार का ? हाच खरा प्रश्न आहे .

सातारा जिल्हा हा नायगाव (खंडाळा) गावच्या शिक्षण माता सावित्रीबाई फुले यांचा जिल्हा आहे . धावडशी येथील झाशीची राणी लक्ष्मीबाई, पहिली महिला कर्नल धनश्री सावंत जगताप लिंक ट्रेन चालक सुरेखा यादव मेट्रो चालक अपूर्व अलटकर , धावपटू ललिता बाबर जनाबाई हिरवे खासदार प्रमिला काकी चव्हाण सामाजिक कार्यात ड.वर्षा देशपांडे, चेतना सिन्हा, गायन क्षेत्रात यमुना वाईकर, रोशन सातारकर साहित्य क्षेत्रात बेबी कांबळे डॉ शालिनीताई पाटील अशा अनेक महिलांनी कर्तबगारी दाखवून सार्वजनिक जीवनात आपला ठसा उमटवलेला आहे. आजही त्यांच्या कार्याची ओळख समाज विसरलेला नाही. अशावेळी सौ सीमा पोतदार यांना संधी देण्यासाठी राजकीय पक्षाने पुढे आले तर खऱ्या अर्थाने सव्वा नऊ लाख महिला मतदारांचा गौरव ठरेल .अशा शब्दात अनेक मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिलेले आहेत.

## शिरोळ तहसीलदार कार्यालयात जागतिक ग्राहक दिन संपन्न

**शिरोळ :** ऑनलाइनच्या दुनियेमध्ये ग्राहक व शेतकऱ्यांनी डोळसपणे ऑनलाइन खरेदी विक्री बँकिंग इतर व्यवहारही जागृतपणे करावेत आपली फसवणूक होणार नाही याची दखल घ्यावी असे आवाहन शिरोळचे नायब तहसीलदार योगेश जमदाडे यांनी केले जागतिक ग्राहक हक्क दिन तहसीलदार कार्यालयात साजरा करण्यात आला या याप्रसंगी ते अध्यक्ष पदावरून बोलत होते

अन्नपुरवठा विभागाचे अरुण माळगे व ग्राहक कल्याण फाऊंडेशन शिरोळ तालुकाध्यक्ष सुभाष माळी सर , अखिल भारतीय ग्राहक संघटनेचे राजेश संभु शेटे, ग्राहक पंचायतीचे मेहबूब बागवान खंडेराव हेरवाडे उदय आवळे एडवोकेट सुशांत सदस्य उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले विशेषता शेतकरी व्यापारी व ग्राहक यांना कायद्याची माहिती असणे आवश्यक आहे, त्याचबरोबर सायबर गुन्हेगारी व फसवणूक होत आहे सर्वांना कायद्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे असे शेवटी सांगितले

ग्राहक चळवळ जर यशस्वी करायची असेल तर गाव तिथे कार्यकर्ता असणे आवश्यक आहे त्याचबरोबर ग्राहकांचे अभ्यासवर्ग व प्रबोधनाचे कार्यक्रम प्रभावीपणे राबवणे गरजेचे आहे.

ग्राहकांना आपले कर्तव्य हक्क व अधिकार याविषयी माहिती असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर फसवणूक झाल्यानंतर तक्रार देण्यासाठी व आपणाला न्याय हक्क मिळण्यासाठी पुढे येणे गरजेचे आहे. आत्ताच्या तंत्र युगात नवनवीन फसवणुकीचे फंडे समोर येत आहेत.

# हुतात्मा राजगुरू यांचे स्मारकाचे भूमिपूजन संपन्न



**राजगुरुनगर ( वा.) :** राजगुरुनगर येथील हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या बहु प्रतिक्षिप्त जन्म स्थळ स्मारकाचे भूमीपूजन आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. महाराष्ट्र सरकारने नुकतेच या कामी १०२ कोटी ४८ लक्ष रुपये मंजूर केले आहेत,त्या निधीतून हुतात्मा राजगुरू यांच्या बलिदान , त्याग यांना साजेसे भव्य दिव्य स्मारक निर्माण होणार आहे.गेली तीस वर्षे हुतात्मा राजगुरू स्मारक होणे कामी विविध संस्था संघटना प्रयत्नशील आहेत.अखेर आता स्मारक बांधकाम होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. हुतात्मा राजगुरू स्मारक समिती अध्यक्ष अतुल देशमुख व सदस्य गेली अनेक दिवस याबाबत पाठपुरावा करत आहे.

आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी मागील वर्षीच्या अर्थ संकल्प अधिवेशनात या स्मारक बांधकाम कामी लक्षवेधी सूचना मांडली होती. सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी याबाबत समिती तयार करून विकास आराखडा तयार करण्यात आला होता.या आराखड्यास अंतिम मंजुरी देण्यात आली.यातून स्मारक बांधकाम कामी व भू संपादन कामी १०२ कोटी ४८ लक्ष रुपये मंजूर करण्यात आले आहे.

या स्मारक बांधकामाचे भूमिपूजन आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या हस्ते झाले.यावेळी आमदार मोहिते म्हणाले गेली अनेक वर्षे हुतात्मा राजगुरू स्मारक कामी पाठपुरावा सुरू होता, या कामी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील या सर्वांचे योगदान लाभले, हुतात्मा राजगुरू स्मारकालगत नवीन झालेल्या पुलाचे उद्घाटन पुढील काळात लवकरच करणार आहे. हे स्मारक राजगुरुनगर शहराच्या वैभवात भर घालणारे होईल. देशातील अनेक देशभक्त,युवक येथे येऊन हुतात्मा राजगुरू यांच्या बलिदानाचे स्मरण करून देशभक्तीच्या प्रेरणा घेऊन जातील.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष कैलास सांडभोर,कात्रज डेअरी संचालक अरुण चांभारे, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती कैलास लिंभोरे, संचालक भरत कड , माजी सभापती अशोक राक्षे,चंद्रकांत दादा इंगवले, विनायक घुमटकर, माजी जिल्हा परिषद सदस्य मंगलताई चांभारे महिला शहर अध्यक्ष ड.मनीषा पवळे,शहर अध्यक्ष सुभाष होले,युवक अध्यक्ष सागर सातकर ,पी.एम.आर. डी.संचालक वसंत भसे , तसेच ऍड.निलेश आंधळे, स्विय सहाय्यक सतीश कदम, संतोष सांडभोर,बाळासाहेब सांडभोर, ऍड.सूनिल वाळुंज ,अमित घुमटकर ,योगेश पवार ,संतोष भांगे, किशोर ओसवाल,शुभम सोनवणे यांसह मोठ्या संख्येने नागरिक ,महिला उपस्थित होत्या. या स्मारक बांधकामाच्या नासदिय कंपनी पुणेच्या वास्तुविशारद अर्चना देशमुख यांनी यावेळी स्मारक बांधकाम आराखडा कसा असेल ही माहिती दिली. सवानी हेरिटेज पुणे कंपनीचे राहुल चव्हाण यांनी विविध नकाशे यावेळी सादर केले.

कार्यक्रम संयोजन राष्ट्रवादी काँग्रेस शहर अध्यक्ष सागर सातकर, स्वीय सहाय्यक सतीश कदम, ऍड निलेश आंधळे, इजाजभाई तांबोळी शुभम सोनवणे यांनी केले. कार्यक्रम पौरोहित्य अवधूत प्रसादे,सूत्रसंचालन कैलास दुधाळे ,प्रास्ताविक मधुकर गिलबिले, आभार ड.निलेश आंधळे यांनी मानले.



## कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी नागरीकांना शांतता बाळगायला हवे : पो.आयुक्त अमितेश कुमार

### कोंढवा पोलीस स्टेशन तर्फे कौसर बाग ग्राऊंडवर इफ्तार पार्टीचे आयोजन

**हडपसर :** सध्या रमजान ईद महिना सुरु आहे, जयंती उत्सव येत आहेत,समाजात जातीय सलोखा ,शांतता राखण्यासाठी कायदा व सुव्यवस्था अबाधित राहाण्यासाठी नागरीकांनी आपआपसात भांडणतंटे न करता शांततेत सण उत्सव आनंदात साजरे करावेत, समाजात कुठे काय अनुचित प्रकार घडत असेलतर ११२ नंबर वर कॉल करुन पोलीसांना माहिती द्यावी ,पोलीस प्रशासनास मदत करण्याबाबत आव्हान करावे, पोलीस सदैव तुमच्या सवेसाठी हजर आहेत ,पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी कोंढवा पोलीस स्टेशन हद्दीत इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते मार्गदर्शन करताना बोलत होते.

कोंढवा कौसर बाग येथील मैदानावर मुस्लिम बांधवांचे रमजान ईद निमित्त इफ्तार पार्टी चे आयोजन सायंकाळी कोंढवा पोलीस स्टेशन तर्फे करण्यात आलेले होते.

कार्यक्रमांमध्ये प्रमुख उपस्थिती अमितेश कुमार पोलीस आयुक्त पुणे शहर,प्रवीण पवार सह पोलीस आयुक्त पुणे शहर, मनोज पाटील अप्पर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर,आर राजा पोलीस उप आयुक्त सो.परिमंडळ ५ , सहा पोलीस आयुक्त गणेश इंगळे, वानवडी विभाग तसेच परिमंडळ ०५ कोंढवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे ,पोलीस कर्मचारी ,माजी आमदार महादेव बाबर ,माजी आमदार योगेश टिळेकर,आमदार चेतन तुपे ,माजी नगरसेवक गफुर पठाण, माजी नगरसेविका नंदा लोणकर, हसीना इनामदार, जाहीद भाई शेख, मौलाना ,कारी इद्रिस, मौलाना सूफी अन्वर, साईनाथ बाबर, अबिद सय्यद, समीर अन्सार शेख, आदी मान्यवर उपस्थित होते .इफ्तार पार्टीला जवळपास २००० ते २५०० जनसमुदाय उपस्थित होता.

# दुर्गसंवर्धन म्हणजे आपल्या पूर्वजांचा वारसा जतन करणे होय : प्रा.विनायक खोत

## पालक-शिक्षक संघाच्या वतीने सबनीस विद्यालयात वारसा जुन्नरचा व्याख्यानाचे आयोजन



**नारायणगाव :-** आमचे पूर्वज किती महान होते हे जोपर्यंत तुम्ही समजून घेणार नाही तोपर्यंत तुम्हाला स्वतःचा अभिमान वाटणार नाही. त्यासाठी आपल्या पूर्वजांचा इतिहास समजून घ्या. किल्ले आपल्या पूर्वजांचा इतिहास सांगतात, दुर्गसंवर्धन म्हणजे आपल्या पूर्वजांचा वारसा जतन करणे होय, जुन्नर तालुक्यातील गिरिदुर्ग,स्थळदुर्गांची माहिती समजून घ्या. प्रत्येक किल्ल्याचा इतिहास, किल्ल्याची बांधणी, किल्ल्यावरील राज्यकर्ते शासक, त्यांचा कालावधी त्यामध्ये झालेली स्थित्यंतरे हे सर्व समजून घेणे म्हणजे जुन्नरचा वारसा समजून घेणे होय .

असे मनोगत प्रसिध्द दुर्गसेवक, शिवनेरभूषण प्रा.विनायक खोत यांनी व्यक्त केले.

नारायणगाव येथील ग्रामोन्नती मंडळाचे गुरुवर्य रा. प.सबनीस विद्यामंदिर पालक संघ,रोटरी क्लब नारायणगाव यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित केलेल्या वारसा जुन्नरचा या व्याख्यानात ते बोलत होते.

यावेळी ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष कृषीरत्न अनिलतात्या मेहेर,गटशिक्षण अधिकारी अनिता शिंदे, रोटरी क्लबचे अध्यक्ष संदीप गांधी,मंगेश मेहेर, मुख्याध्यापिका व पालक संघाच्या अध्यक्षा अनुराधा पुरानिक,उपमुख्याध्यापक सतीश तंवर,पर्यवेक्षक रतीलाल बाबेल, विलास शिंदे,सुषमा वाळिंबे,शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा कल्पना डुंबरे, पालक संघाच्या सचिव अनुपमा पाटे, उपाध्यक्ष परशुराम वारुळे,मंदार पाटे,महेश मोरे,मधुकर जाधव,विद्या सहाने,वंदना नेहेरकर,जयश्री कोल्हे, माधुरी बनकर इत्यादी मान्यवरांसह पालक,शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जुन्नर मधील नाणेघाटातील सर्वात मोठा शिलालेख हा मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यासाठी सर्वात मोठा पुरावा ठरत आहे, ब्राम्ही लिपी मध्ये असणारा हा शिलालेख विद्यार्थ्यांनी समजून घ्यावा,महाराष्ट्राच्या अस्तित्वाच्या खुणा सांगणाऱ्या बहुतांश लेण्या या जुन्नर मध्ये आहेत ,त्याच्या अभ्यासासोबत येथील विविध काळातील ऐतिहासिक स्थापत्य कला समजावून घेणे म्हणजेच जुन्नरचा वारसा जतन करणे होय.असेही यावेळी दुर्गसेवक प्रा.विनायक खोत यांनी सांगितले.

ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष अनिलतात्या मेहेर यांनी यावेळी बोलताना सांगितले की विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जपली पाहिजे,त्यासाठी शाळेच्या समृद्ध ग्रंथालयाचा आपण वापर करावा.वक्तृत्व स्पर्धा सारख्या विविध स्पर्धा या व्यक्तिमत्व विकासासाठी पूरक ठरतात.अशा स्पर्धांमध्ये सातत्याने सहभाग घ्यावा. जागतिकीकरणामध्ये विद्यार्थ्यांनी टिकून राहण्यासाठी ग्रामोन्नती मंडळ विविध आंतरराष्ट्रीय विद्यापीठांशी अभ्यास विषयक करार करीत आहे असेही श्री.मेहेर यांनी सांगितले.

यावेळी चालू शैक्षणिक वर्षामध्ये निवृत्त होणारे मुख्याध्यापिका अनुराधा पुराणिक,पर्यवेक्षक रतिलाल बाबेल आणि प्रयोगशाळा सहाय्यक मारुती कोल्हे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन विशेष सत्कार करण्या आला.तसेच शिक्षक पालक संघ आयोजित वक्तृत्व स्पर्धा,रोटरी क्लब नारायणगाव आयोजित चित्रकला स्पर्धा आणि जुन्नर तालुका आंतरशालेय नाट्य स्पर्धा यांमधील यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्याध्यापक सतीश तंवर यांनी केले अहवाल वाचन सचिव अनुपमा पाटे यांनी केले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.रमेश शेटे,रागिणी शिंदे, वनिता ढवळे यांनी केले व आभार प्रा.मधुरा काळभोर यांनी मानले.

# लाभार्थींच्या घरकुलांचे बांधकामाचा शुभारंभ



**मागासवर्गीय फंडातून मंजूर झालेल्या लाभार्थींच्या घराच्या बांधकामाचे शुभारंभ करताना ग्रामपंचायत नरसिंहवाडी पदाधिकारी.**

**कुरुंदवाड :** श्रीक्षेत्र नृसिंह वाडी येथे ग्रामपंचायत मागासवर्गीय १५ टक्के फंडातून मंजूर करण्यात आलेल्या नऊ लाभार्थींच्या घरकुलांचे बांधकामाचा शुभारंभ शनिवारी सकाळी ११ वाजता आचारसंहिता लागणे पूर्वी नृसिंह वाडीतील जेष्ठ नेते धनाजीराव जगदाळे उपसरपंच रमेश मोरे सागर धनवडे आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला काही दिवसापूर्वी उपसरपंच म्हणून रमेश मोरे यांनी पदभार स्वीकारला आणि लगेच घरकुल यांच्या कामांना सुरुवात झाल्याने समाधान पसरले आहे.

नृसिंहवाडी रहिवासी उमेश कांबळे महेश कांबळे नयन शिंदे केवल परमार प्रज्ञा कांबळे अमोल कांबळे सिद्धार्थ कांबळे आकाश कांबळे आप्पासो मानगावे आदि ना ग्रामपंचायतच्या १५ टक्के मागासवर्गीय योजनेतून प्रत्येकी दीड लाख रुपयाचे घरकुल मंजूर झाले आहे.

त्याचा शुभारंभ शनिवारी स ११ वाजता ग्रामपंचायत पदाधिकारी व मान्यवरांच्या हस्ते मागासवर्गीय वस्तीमध्ये करण्यात आला यावेळी ग्रामपंचायत सदस्य सौ चित्रा सुतार सौ अनघा पुजारी सौ विद्या कांबळे चेतन गवळी युवराज जगदाळे बजरंग कांबळे माजी सरपंच राजश्री कांबळे अजय कंदले सुरेश गवंडी जनार्दन कुमठेकर रवी साके कर आदी मान्यवर उपस्थित होते फोटो मेल करीत आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वाठार पोलिसांचे कोंबिंग ऑपरेशन

**आसनगाव :** आगामी काळात होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वाठार स्टेशन पोलिसांकडून बनवडी ता.कोरेगाव येथे कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात आले. देशात सद्यस्थितीत लागू झालेल्या लोकसभा निवडणुक लक्षात घेत समाजात शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या हेतूने वाठार स्टेशन पोलिसांकडून बनवडी इब्राहिमपूर परिसरातील पारधी वस्तीत शनिवारी मध्यरात्री सव्वा एक ते तीन या दरम्यान कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात आले.यावेळी वाठार स्टेशन पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरिक्षक अशोक हुलगे,यांसह आठ पोलिस अंमलदार चार होमगार्ड,सीमा सुरक्षा दलाचे एक अधिकारी व सोळा जवान उपस्थित होते.यावेळी सहाय्यक पोलिस निरिक्षक अशोक हुलगे यांनी या ठिकाणी पारधी वस्तीतील लोकांना लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता व मार्गदर्शक सूचना यांची माहिती दिली.तसेच चंदनगड पायथा व आजूबाजूचा परिसराची पाहणी केली. सदर कृती सातारा पोलिस अधीक्षक समीर शेख, अप्पर पोलिस अधिक्षक ऑचल दलाल कोरेगाव उपविभागीय पोलीस अधिकारी सोनाली कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.



आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वाठार पोलिस यांच्याकडून बनवडी परिसरात कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात आले.

# माता रमाईचे विचार संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहचवायला हवे : रमेश बागवे

**हडपसर पुणे :** माता रमाईने भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अतिशय प्रतिकूल परिस्थितीत साथ दिली, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना रमाईची खंबीर साथ होती म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिक्षण घेऊ शकले ,ज्ञान ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्त माता रमाई बहुउद्देशीय महिला समाज संस्थेचे उद्घाटन आज होत आहे संस्थेच्या माध्यमातून रमाईचे विचार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहचवायला हवे असे मत माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे यांनी केले.

या कार्यक्रमाचा आयोजन संस्थापक अध्यक्षा छाया जाधव यांनी केले होते.

या प्रसंगी अँड.अभय छाजेड,विठ्ठल गायकवाड,सोनाली मारणे ज्योती आरवेन, नलिनी दोडगे, शर्वरी गोतारणे,कांचन बालनायक,मोती ताई उडते, वासिमजी शेख संस्थेचे उपाध्यक्ष, सचिव,खजिनदार, सदस्य व सर्व पदाधिकारी,फुले -शाहू आंबेडकर चळवळीतील अनेक सामाजिक कार्यकर्ते, उपस्थित होते.



महिला दिनाचे औचित्य साधून महिलांचा संस्थेच्या वतीने सत्कार प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पुढे बागवे म्हणाले की,या संस्थेच्या नावाला साजेल असे संस्था पदाधिकाऱ्यांनी भरीव कार्य समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोचवावे संस्थेचे उद्देश लक्षात घेऊन प्रत्येक घराघरात संस्थेचे कार्य कसे अल्पकाळात जाईल यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे.

यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अभय छाजेड म्हणाले की, सामाजिक कार्य करण्यासाठी संस्था योग्य माध्यम आहे ही संस्था भविष्यामध्ये अग्रगण्य संस्था होण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत बहुउद्देशीय कार्य करणारी ही एक महिलांच्या प्रश्नावरती काम करणारी संस्था नावारूपाला आणावी, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल गायकवाड यांनी केले राहुल जाधव यांनी आभार मानले.

# साताऱ्यात जुन्या सिव्हिलच्या जागेवर उभारणार सुसज्ञ कॅथलॅब

## आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या पाठपुराव्याला मोठे यश

**सातारा ;** दिवसेंदिवस हृदयविकाराच्या रुग्णांचे प्रमाण वाढत आहे. हृदयरोगावर आधुनिक उपचार मिळण्यासाठी साताऱ्यातील रुग्णांना पुणे, मुंबई अथवा अन्य मोठ्या शहरांमध्ये जावे लागत आहे. मात्र आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या पाठपुराव्यामुळे सातारा जिल्ह्यातील रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या मागणीनुसार साताऱ्यातील जुन्या सिव्हिल हॉस्पिटलच्या जागेवर सुसज्ज आणि सर्व सोयी- सुविधांनी युक्त कॅथलॅब उभारण्यास मंजुरी मिळाली आहे. याबद्दल आ. शिवेंद्रसिंहराजेंनी जिल्हावासियांच्यावतीने उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस आणि आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांचे आभार मानले आहेत.

शिवेंद्रसिंहराजेंनी काही महिन्यांपूर्वी उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातारा शहरातील शाही मस्जिदच्या शेजारील जुन्या



सिव्हिल हॉस्पिटलच्या जागेत सुसज्ज कॅथलॅब उभारण्यात यावी, अशी मागणी करून या आशयाचे निवेदनही दिले होते. त्याचवेळी ना. फडणवीस यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना कॅथलॅब उभारणीसाठीची पुढील कार्यवाही सुरु करण्याचे आदेश दिले. तसेच सातारा जिल्हा रुग्णालयाचे तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुभाष चव्हाण यांना कॅथलॅब उभारणीचा परिपूर्ण प्रस्ताव तातडीने तयार करून राज्य शासनाकडे पाठवण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाला राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने नुकतीच मंजुरी दिली आहे.

लवकरच जुन्या सिव्हिल हॉस्पिटलच्या जागेवर सुसज्ज कॅथलॅब उभारली जाणार असून हृदयविकारावर उपचारासाठी आवश्यक असणारी सर्व यंत्रसामुग्री याठिकाणी असणार आहे. कॅथलॅबमधे तपासणी विभाग (ओपीडी), ऑपरेशन थिएटर, रिकव्हरी रूम, आठ ते दहा बेडचा वॉर्ड आदी सुविधा असणार आहेत.

कॅथलॅबमध्ये ऍंजिओग्राफी, एन्जीओप्लास्टी यासह सर्वप्रकारचे उपचार केले जाणार आहेत. यासाठीचे तज्ञ् वैद्यकीय पथक आणि स्टाफही असणार आहे. या सुसज्ज कॅथलॅबमुळे सातारा जिल्ह्यातील हृदयरोग रुग्णांची ससेहोलपट थांबणार असून त्यांना साताऱ्यातच अत्याधुनिक उपचार मिळणार आहेत. कॅथलॅब मंजुरीमुळे आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले असून जिल्हावासियांमधून समाधान व्यक्त होत आहे.

# लोकसभा निवडणुकीच्या उमेदवारीबाबत उदयनराजे यांचे सुचक वक्तव्य

**सातारा :** सातारा लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवारी बाबत वेळ आल्यानंतर निर्णय घेतला जाईल .उमेदवारीची मागणी करण्याचा सगळ्यांना अधिकार आहे आणि माझ्या नाराजीचे बोलाल तर मी काही संन्यास घेतलेला नाही असे सूचक वक्तव्य खासदार उदयनराजे भोसले यांनी साताऱ्यात केले.

सातारा पालिकेच्या वतीने हुतात्मा उद्यान परिसरात विकसित करण्यात आलेल्या कर्नल संतोष महाडिक स्मृती स्थळाचे उद्घाटन व लोकार्पण खासदार उदयनराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी लोकसभा संयोजक सुनील काटकर, माजी उपनगराध्यक्ष एडवोकेट दत्ता बनकर, माजी उपनगराध्यक्ष मनोज शेंडे, विनीत पाटील, इत्यादी यावेळी उपस्थित होते .उदयनराजे भोसले यांनी या स्मृतिस्थळाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले सातारा जिल्ह्यातील वेगवेगळ्या संरक्षण क्षेत्रातील दिवंगत सैनिकांच्या स्मृती जागवणे आणि आजच्या पिढीने त्यांच्यापासून प्रेरणा घेणे हे या स्मृतिस्थळाच्या उभारणीचे वैशिष्ट्य आहे .या कामाला उशीर झाला नाही का असा प्रश्न केला असता उदयनराजे म्हणाले मी काही जादूगार नाही कोणत्याही कामासाठी वेळ हा लागणारच त्याचे निधी आणण्यापासून उभारणी करणे प्रत्येक टप्पा ठरलेला असतो तब्बल अडीच कोटी रुपये खर्च करून हे स्मृती उद्यान विकसित करण्यात आले आहे किरकोळ बागेचे काम राहिले आहे या संदर्भात सातारा पालिकेने तत्कालीन परिस्थिती ठराव केला होता सातारा जिल्हा ही वीरांची भूमी आहे त्यांचे स्मरण करणे यासाठी हे पवित्र स्मृतिस्थळ उभारण्यात आले आहे या कामाला उशीर झाला आहे का असे विचारले असता ते म्हणाले उशीर कसा झाला प्रत्येक गोष्टीला प्रोजेक्ट टाईम ठरलेला असतो माझ्या हातात जादूची कांडी असती तर हा विकास प्रकल्प एका दिवसात उभा केला असता निधी उभारणीसाठी वेळ लागला आपली महानगरपालिका नाही तर नगरपालिका आहे याला उशीर झाला असेल असे कोणी म्हणत असेल तर त्याला माझा इलाज नाही

सातारा लोकसभेच्या उमेदवारी संदर्भात आपल्याला तिकीट मिळणार का या प्रश्नावर ते म्हणाले माझ्याजवळ बसचे तिकीट आहे.

# पारदर्शी मतदानासाठी प्रशासन सज्ज!

**पुणे :** पुणे जिल्ह्यात पुणे, बारामती, मावळ आणि शिरूर हे चार लोकसभा मतदारसंघ आहेत. राज्यात एकमेव हा जिल्हा आहे, जिथे चार लोकसभा मतदारसंघ असून, एकूण मतदारांची संख्या ८२ लाख २४ हजार ४२३ आहे.

त्यासाठी ८ हजार ३८२ मतदान केंद्रे असतील. तर ४४ ईव्हीएम मशीन लागणार आहेत, तसेच निवडणूकीसाठी आवश्यक मनुष्यबळ देखील सज्ज करण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी पत्रकार परिषदेत दिली. पारदर्शी मतदानासाठी आम्ही कडक बंदोबस्त देखील करू, असेही आश्वासन त्यांनी दिले.



# जागतिक महिलां दिनाचे औचित्य साधुन शक्ती फाउंडेशन कडून महिलांचा सन्मान

**हडपसर :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा शक्ति सोशल फाऊंडेशन च्या वतीने सन्मान चिन्ह, शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. शक्ती फाउंडेशन चे अध्यक्ष सुरज गायकवाड व पायल गायकवाड यांनी पुणे महानगरपालिकेच्या हडपसर मुंढवा क्षेत्रीय कार्यालयातील गेल्या अनेक वर्षांपासून परिसरातील स्वच्छतेचे काम करणार्या महिला कर्मचाऱ्यांचा मस्वच्छता दुतफ म्हणून सन्मान चिन्ह व सन्मानपत्र देऊन गैरव केला.

या वेळी कार्यक्रमास उपस्थित हडपसर पोलीस स्टेशन च्या गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक मंगल मोढवे/ काळभोर,ड अर्चना गायकवाड, ड नागिनी काकडे, पुणे महापालिकेच्या आरोग्य अधिकारी वैशाली फुंदे,अर्चना आल्हाट,सरला गायकवाड, पुणे महानगरपालिकेचे आरोग्य विभागाचे अधिकारी दत्तात्रय पोळ,प्रदीप रोकडे,नरेंद्र आल्हाट, पुंडलिक रणदिवे, महादेव कांबळे,राहुल कांबळे,आशिष आल्हाट, देविदास बिनवडे,आदी मान्यवर उपस्थित होते .

# जावली तालुक्यातील ११ रस्त्यांच्या सुधारणेसाठी २५ कोटी मंजूर

**सातारा :** सातारा- जावली विधानसभा मतदारसंघात विविध विकासकामे मार्गी लावण्यासाठी निधीचा अक्षरशः वर्षाव करणाऱ्या आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या पाठपुराव्यातून जावली तालुक्यातील ११ रस्त्यांची सुधारणा, पूल आणि पोहोच रस्ते करण्यासाठी तब्बल २५ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्ते व पूल परीक्षण व दुरुस्ती कार्यक्रम सन २०२३-२४ अंतर्गत रस्ते दुरुस्ती कार्यक्रम या योजनेतून हा निधी उपलब्ध झाला आहे. निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. शिवेंद्रसिंहराजेंनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ना. अजित पवार यांचे आभार मानले आहेत.

जावली तालुक्यातील पाचगणी कुडाळ रस्ता (प्रजिमा- २५) कि.मी. ०/०० ते ५/२०० (भाग: पाचगणी ते काटवली) सुधारणा करणे यासाठी २ कोटी ६० लाख, सातारा, येवतेश्वर पेट्री घाटाईदेवी फाटा घाटाईदेवी मंदिर कास बामणोली गोगवे तापोळा महाबळेश्वर रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग-२६ कि.मी ५५/६०० ते ५९/७०० (भाग-निपाणी ते जावळी तालुका हद्द) रूंदीकरणासह सुधारणा करणे यासाठी २ कोटी ७० लाख, मेढा (वेण्णा चौक) कुसुंबी सह्याद्रीनगर कोळघर फाटा अंधारी मुनावळे वाघळी शेंबडी बामणोली रस्ता (प्रजिमा-१५२) कि.मी ३२/३०० ते ४०/३०० (भाग:- शेंबडी ते बामणोली) ची सुधारणा करणेसाठी २ कोटी ५० लाख, पाचगणी कुडाळ रस्ता (प्रजिमा २५) कि.मी. १४/००० ते १७/५०० मध्ये रस्त्याची सुधारणा करणे, (भाग: आखाडे ते सोमर्डी) याकामासाठी २ कोटी ५० लाख रुपये निधी उपलब्ध झाला आहे.

सातारा येवतेश्वर पेट्री घाटाईदेवी फाटा घाटाईदेवी मंदिर कास बामणोली गोगवे तापोळा महाबळेश्वर रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग २६ कि.मी ३४/८३० ते ३७/८३० (भाग अंधारी ते फळणी) (३.७५ मी. चे ५.५० मी. ने) ची रूंदीकरणासह सुधारणा करणेसाठी २ कोटी ५० लाख, सातारा येवतेश्वर पेट्री घाटाईदेवी फाटा घाटाईदेवी मंदिर कास बामणोली गोगवे २८५.०० तापोळा महाबळेश्वर रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग २६ कि.मी ४०/६९० ते ४४/७९० (भाग- बामणोली ते म्हावशी) (३.७५ मी. चे ५.५० मी. ने) रूंदीकरणासह सुधारणा करणेसाठी २ कोटी ८५ लाख रुपये निधी मिळाला आहे. प्रजिमा-२६ कास एकीव गाळदेव माचुतर रस्ता (प्रजिमा-१४८) कि. मी. ६/०० ते २८०,०० १/५०० ची रूंदीकरणासह सुधारणा करणे (३.७५ मी. चे ५.५० मी. ने) (भाग: सह्याद्रीनगर ते म्हाते मुरा) याकामासाठी २ कोटी ८० लाख, प्रजिमा-२६ कास एकीव गाळदेव माचुतर रस्ता (प्रजिमा-१४८) कि.मी. १३/००० ते १६/००० (३.७५ मी. चे ५.५० मी. ने) ची रूंदीकरणासह सुधारणा करणेसाठी २ कोटी ७५ लाख, मेढा (वेण्णा चौक) कुसुंबी सह्याद्रीनगर कोळघर फाटा अंधारी मुनावळे वाघळी शेंबडी बामणोली रस्ता (प्रजिमा-१५२) कि.मी ३८/३५० येथे लहान पुलाचे पोहोचमार्गासह बांधकाम करणेसाठी १ कोटी ३० लाख, पाचगणी कुडाळ रस्ता (प्रजिमा- २५) कि.मी. ५/३००, ५/४५०, ६/१००, ६/४५० व ६/६०० मध्ये मोऱ्यांचे बांधकाम करणे १ कोटी ५० लाख, सातारा येवतेश्वर पेट्री घाटाईदेवी फाटा घाटाईदेवी मंदिर कास बामणोली गोगवे तापोळा महाबळेश्वर रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग २६ कि.मी. ४७/८३० (तेटली गावाजवळ) लहान पुलाचे पाहोचमार्गासह बांधकाम करणेसाठी १ कोटी रुपये एवढा निधी मंजूर झाला आहे.

# मावळात दोन हुक्का पार्लरवर कारवाई

**वडगाव मावळ :** मावळ तालुक्यातील पुणे मुंबई महामार्गावर लगत असलेल्या कार्ला गावाच्या हद्दीतील बैठक ढाब्यावर सुरु असलेल्या हुक्का पार्लरवर लोणावळा उपविभागाचे सहाय्यक पोलीस अधीक्षक सत्यसाई कार्तिक यांच्या पोलिस पथकाने कारवाई केली. त्यामध्ये ४४ हजार ७९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

१) कृष्णा नाथा राठोड, वय ३१ वर्षे, रा.लोणावळा कालेकरमळा, दत्त मंदीरासमोर लोणावळा, ता. मावळ, जि. पुणे,२)प्रताप कृष्णा डिंमळे वय ४२ वर्षे, व्यवसाय हाटेल मालक, रा. कार्ला, ता. मावळ, जि.पुणे, ३) बिपीन्छु मार परमेश्वर महतो, वय ३०वर्षे, रा. भारती अपार्टमेंन्ट फ्लॅट नं.२०२ साईबाबा मंदीराजवळ शांतीनगर उल्हासनगर,ठाणे अशी गुन्हा दाखल झाल्याची नावे आहेत

यापरकरणी पोलिस शिपाई सचिन गायकवाड यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली

लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात हद्दीत कार्ला येथील बैठक ढाब्यावर बेकायदेशीरपणे हुक्का पार्लर सुरु असल्याची माहिती सहायक पोलिस अधीक्षक सत्यसाई कार्तिक यांना मिळाली त्या माहितीच्या आधारे दि १६ रोजी मध्यरात्री

पोलिसांनी छापा मारून कारवाई करत अवैध हुक्का पार्लर चालवून ग्राहकांना अवैधपणे हुक्का पिण्यासाठी देत असल्याचे मिळून आल्याने त्याठिकाणी विक्रीसाठी असलेला हुकक्यासाठी लागणारे पॉट, तंबाखुयुक्त फ्लेवर्स, फिल्टर, पाइप ई. असा एकूण ४४ हजार ७९० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला

यापरकरणी रूरतम वकील अहमद (वय २२, रा. लोणावळा ता.मावळ जि.पुणे,रोशन मनोज यादव (वय ३० रा.छत्रपती शिवाजी महाराज चौक तुंगार्ली ता मावळ जि.पुणे) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यापरकरणी दोन गुन्हे मध्ये आरोपीच्या विरोधात सिगारेट व इतर तंबाखजन्य उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार, वाणिज्य उत्पादन पुरवठा आणि वित्तरण, विनीमय) अधिनियम २००३ चे सुधारित अधिनियम २०१८ चे कलम ४ (अ) व २१ (अ) सह भादवि कलम १८८, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास लोणावळा ग्रामीण पोलीस करत आहेत.

सदरची कारवाई पुणे ग्रामीण पोलीस दलाचे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे यांचे मार्गदर्शनाखाली लोणावळा उपविभागाचे सहा.पोलीस अधीक्षक श्री सत्यसाई कार्तिक, पोसई शुभम चव्हाण, पोसई रोहन पाटील, पो.हवा अंकुश नायकुडे, पो. ना. सचिन गायकवाड, पो.कॉ सुभाष शिंदे, पो.कॉ अंकुश पवार, पो.कॉ गणेश येळवंडे, पो.कॉ काळे, पो.कॉ टकले, पो.कॉ माळवे, पो.कॉ पवार, म.पोकॉ चवरे, म.पोकॉ शिंदे यांचे पथकाने केली आहे.



## लोणावळ्यातील हॉटेल युटोपिया हाय व हॉटेल कुमार रिसॉटवर पोलिसाचा छापा

**दुसरी कारवाई लोणावळ्यातील हॉटेल युटोपिया हाय व हॉटेल कुमार रिसॉटवर करण्यात आली. यामध्ये ४८ हजार ७९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला**

# भाजपासारखा गोरक्षणाचा आपला दिखाऊपणा नाही

## खा.डॉ. अमोल कोल्हे यांचे गो संरक्षण व गोपालनाचे कृतीद्वारे अनुकरण





**नारायणगाव :** आपण भारतीय जनता पार्टी सारखा गोपालनाचा किंवा गोसंरक्षणाचा दिखाऊपणा करत नाही तर प्रत्यक्ष गो संरक्षण व गोपालनाचे कृतीद्वारे अनुकरण करत असल्याचे शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ अमोल कोल्हे यांनी सांगितले.

नारायणगाव येथील खासदार डॉक्टर कोल्हे हे आपल्या शेतामध्ये उभारलेल्या सप्तधेनू श्रीकृष्ण मंदिराच्या उद्घाटनप्रसंगी पत्रकारांशी बोलत होते. याप्रसंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे तालुकाप्रमुख माऊली खंडागळे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते अनंतराव चौगुले, तालुकाध्यक्ष तुषार थोरात,काँग्रेसचे नेते व विघ्नहर साखर कारखान्याचे चेअरमन सत्यशील शेरकर, ज्येष्ठ नेते शरद लेंडे, कृषीरत्न अनिल तात्या मेहेर, अशोक घोडके, राजश्री बोरकर, सुरज वाजगे, दिलीप कोल्हे तसेच महाविकास आघाडीचे अनेक कार्यकर्ते पदाधिकारी शेतकरी व स्थानिक ग्रामस्थ तसेच खासदार डॉक्टर कोल्हे यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सप्तधेनू या अनोख्या व आगळ्यावेगळ्या मंदिराच्या उभारणी मागे नेमका आपला हेतू काय याविषयी बोलताना खासदार कोल्हे यांनी आपले मार्गदर्शक व कन्हेरी मठाचे प्रमुख कालसिद्धेश्वर स्वामी यांनी या मंदिराची संकल्पना सांगितली त्यानुसार या मंदिराची उभारणी केली आहे . एक आत्मनिर्भर प्रकल्प काय असू शकतो आणि देशी गोवंश प्रत्यक्ष उभारताना किंवा गोवंश पाळताना एक वेगळा अनुभव व संदेश देण्याचा प्रयत्न आपला असल्याचे त्यांनी सांगितले.

संसदेत देखील आपण आपल्याला आपल्या धर्माचा अभिमान आहे असे सांगितले असून केवळ धर्माविषयी अहंकार बाळगण्यापेक्षा आपल्याला त्या धर्माबद्दल अभिमान असणे हे महत्त्वाचे आहे असेही खासदार डॉक्टर कोल्हे यांनी सांगितले.

आगामी लोकसभा निवडणुकीचे आपल्याविरुद्धचे संभाव्य उमेदवार व माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील हे आपल्याला अप्रत्यक्षरीत्या जातीबद्दल बोलत असल्याचे विचारले असता खासदार डॉ कोल्हे यांनी, मी छत्रपती शिवरायांचे विचार घेऊन पुढे जाणारा कार्यकर्ता असून माझी केवळ एकच जात आहे ती म्हणजे मावळा. त्यामुळे सन्माननीय महोदयांना केवळ कास्ट सर्टिफिकेटचा मोह होत असेल तर त्यांना तो लक लाभ ठरो अशी प्रतिक्रिया खासदार डॉ कोल्हे यांनी दिली.

# लोकसभा निवडणुकीसाठी पाटणचे प्रशासन सज्ज



**पाटण :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली असून सातारा लोकसभा मतदारसंघासाठी तिस-या टप्प्यात दिनांक ७ मे रोजी मतदान होणार असून निवडणूकीसाठी पाटणचे प्रशासन सज्ज झाले आहे अशी माहिती पाटणचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी सुनील गाढे यांनी दिली.

होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पाटण तहसीलदार कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत प्रांताधिकारी गाढे, अतिरिक्त सहा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार अनंत गुरव यांनी निवडणूक प्रशासकीय तयारीची माहिती दिली.

यावेळी बोलताना सुनिल गाढे म्हणाले, कालपासून आदर्श आचारसंहितेचे पालन करण्यासाठी पाटण तालुक्यात चार भरारी पथक नेमले आहेत, तालुक्यातील हेळवाक, निसरे, तारळे, तळमावले आदी मुख्य ठिकाणी स्थिर निरीक्षक पथक नेमले आहेत, तालुक्यात एकुण

४०९ मतदान केंद्र आहेत, त्यामध्ये १४९पाटण व ३४६ विहे हि दोन महिला आदर्श केंद्र आहे, १४६ पाटण व २०५ कवठेकरवाडी हि दोन युवा आदर्श मतदान केंद्र केली आहेत, दिव्यांगांसाठी कोंजवडे हे मतदान केंद्र केले आहे तर ऐतिहासिक निवडणूक केंद्र चाफळ केले आहे.

नवमतदार, महिलांसाठी जनजागृती अभियान, पथनाट्य, मेळावे आयोजित करण्यात आले आहेत.

८५ वर्षावरील वयोवृद्ध, व ज्यांना मतदान केंद्रांवर जाऊन मतदान करता येणार नाही असा मतदारांना पोस्टल मतदान करता येणार आहे, ईव्हीएम मशीन वर मतदान होणार असल्याने त्याच्या वापराबाबत माहिती दिली जाईल. ४०९ केंद्रातील मतदान कर्मचारी लोकांचे प्रशिक्षण होईल. अशी माहिती दिली.

तर अतिरिक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार अनंत गुरव यांनी माहिती देताना नागरिकांनी आचारसंहितेचे पालन करावे, खासगी प्रॉप्रटी वर झेंडे बँनर असलेले काढावेत, प्रार्थना स्थळी प्रचार, बँनर लावू नयेत, वाहनांवर लाऊडस्पीकर लावून प्रचार करण्यासाठी सबंधित विभागाकडून परवानगी घ्यावी.

यात्रा, धार्मिक उत्सवासाठी आवश्यक परवाने घ्यावेत अशी माहिती दिली. तसेच प्रशासनाने आचारसंहितेच्या अनुषंगाने कोनशिला, फलक,झाकून टाकले असून फ्लेक्स, झेंडे काढले आहेत. अशी माहिती दिली.



# १८ मार्चपासून गर्भ गृहातील ग्रॅनाईट कामास प्रत्यक्ष सुरुवात

**पंढरपूर :** श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिराच्या संवर्धनाचे व जिर्णोद्वाराचे काम पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली शासन निधीतून सुरू आहे. त्यामध्ये श्रीं.विठ्ठल रूक्मिणीमातेच्या गाभा-याचे संवर्धन आषाढी यात्रा २०२४ पूर्वी करण्याचे प्रस्तावित आहे. तथापि, गाभा-यातील संवर्धनाचे काम करताना मुर्तीचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक असल्याने श्रीच्या दर्शन वेळेत बदल करण्यात आला आहे. याबाबत १२ मार्च रोजी बैठक घेऊन निर्णय घेण्यात आला होता.

मंदिरातील सर्व चांदी काम काढण्यासाठी २५ सदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. या समितीच्या पर्यवेक्षणाखाली सर्व चांदी काढण्यात आली असून, मूर्तीच्या संरक्षणार्थ बुलेटप्रूफ काचेचे आवरण बसविण्यात आले आहे. आता, १८ मार्च पासून गर्भगृहातील ग्रॅनाईट काढण्याच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात येत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

# ऊस तोडणी हंगामाचे अंतिम टप्प्यात विदारक चित्र

**रांजणी :** ऊस हंगम अंतिम टप्प्यात येतोय तशी उसउत्पादकांच्या मनाची लाही लाही होत चालली आहे . वरून तापणारं ऊन पंधरा पंधरा महिने राबुन तोडणीला आलेला ऊस आणि ऊस तोडणी यंत्रणा शिवारात येते तशी शेतकऱ्यांची अस्वस्थता वाढते आणि सुरू होतो ऊसउत्पादकांच्या अस्वस्थतेचा खेळ . वाढी नाही . . . वाट नाही . . . अशी अनेक कारणे शोधली जातात आणि शेवट एका वाक्यावर होतो . . . मालक लावा काडी .एक वर्ष ते दीड वर्षापासून जीवापाड जपलेल्या उसाला थरथरत्या हाताने काडी लावली जाते . काड काड करत ऊस पेट घेतो . पेटत्या पाल्यासह उसाची राख अस्वस्थता मागे सोडत हवेकडे झेपावते.

काळ्याकुट्ट धुरात ज्यादा उत्पन्नाचे इमले धाडधाड कोसळतात . गेल्या काही दिवसापासून बहुतांशी हेच दृश्य दिसून येते . संध्याकाळ झाली की ऊसाला आगी लावायच्या आणि सकाळी चिपाड झालेला उसावर सटसट कोयते चालवत तो ऊस तोडायचा असेच दृश्य सध्या वर्षभर हिरवाई अनुभवलेल्या शिवारापुढे आहे . झालेल्या नुकसानीला जबाबदार कोण ? याचे उत्तर ना साखर कारखान्यांकडे आहे ,ना तोडणी यंत्रणांकडे , जो तो आपले काम करतोय .ऊस तोडणी यंत्रणेला ऊस तोडले की समाधान तर कारखाना व्यवस्थापनाला ऊस मिळाल्याचे .या खेळात ऊस उत्पादकांचा जीव मात्र कासावीस होतोय . वर्षभर वेळेवर पाणी , खते देण्यासाठी दिवस-रात्र जागलेल्या ऊस उत्पादकांची मात्र क्रूर थट्टा होते.

उसाचा हंगाम आता जवळजवळ संपत आलाय . काय करता बघा असा निवर्णीचा इशारा आला की हात आपोआपच आगपेटीकडे जात असल्याचे वेदनादायी चित्र उसाच्या शिवारात दिसून येते .यंदाचा ऊस हंगाम कमी ऊस उत्पादनाच्या अंदाजावर सुरू झाला . ऊस उत्पादन घटण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांचा ऊस कारखाने सहजपणे तोडून नेतील अशी आशा होती परंतु जसा ऊस हंगाम सुरू झाला तशी आशा मावळली . उत्साहाची जागा निराशेने घेतली . कारखान्याचा माणूस घरापर्यंत येईल हा अंदाज खोटा ठरला . उत्पादकाला फिल्डमन ते कारखान्याच्या अध्यक्षांपर्यंत विणवण्या कराव्या लागल्या . इथेही आर्थिक बाब वरचढ ठरली . तोडणी क्रमांक असतानाही ऊस जात नसल्याने ऊस उत्पादक हबकला . शेवटी कुठून अवदसा आठवली आणि ऊस लावला अशा मानसिकतेत येत ऊस उत्पादकाचे हात आगपेटीकडे वळले . यंदाच्या हंगामाचे हे मनाला पिळून टाकणारे चित्र दिसून येते.

# लासलगावी कृषी सेवा केंद्राला आग

**लासलगाव:** येथील कोटमगाव रस्त्यावरील योगेश कृषी सेवा केंद्रास दुपारी दीड वाजेच्या सुमारास अचानकआगलागून शेतीपयोगी कीटकनाशके व औषधे जळून खाक झाल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले.-ऊतएठ-ढखडएचएछढरविवारी (दि. १७) दुपारी दीड वाजेच्या सुमारास अचानकआगलागल्याने आगीने रौद्र रूप धारण केले होते. आगीच्या ज्वाळांचे प्रचंड लोळ आकाशात झेपावले होते. दुकानांमध्ये मोठ्या प्रमाणावर कीटकनाशके खते व औषधे याचा असलेला साठा जळून नुकसान झाले आहे. आग लागलेल्या दुकानामागे शेतीमालाचे विक्री साहित्य गोदाम आहे. गोदामात व्यापाऱ्याने मोठ्या प्रमाणावर औषधे व बी-बियाणे साठवून ठेवला आहे.



# संगीता म्हस्के यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**हडपसर :** शैक्षणिक क्षेत्रातील व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य त्यांच्या कार्याची पोचपावती म्हणून संगीता जगन्नाथ म्हस्के यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

आयडियल पूर्ण प्राथमिक शाळा शनिवार पेठ पुणे येथील शिक्षिका संगीता जगन्नाथ म्हस्के यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार शनिवार दिनांक ९ मार्च २०२४ रोजी राजीव गांधी ई लर्निंग स्कूल पुणे डउएठढ च्या सह संचालिका डॉ.शोभा खंदारे,माजी उपमहापौर आबा बागुल,सहाय्यक प्रशासकीय अधिकारी शुभांगी चव्हाण पुणे मनपा देवराव चव्हाण यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# करवसुली आलेल्या अधिका-यांना शेतकरी संघटनेचा हिसका



पाटण : मार्च इंडींग मुळे सर्वत्र वसुली जोरात सुरू असून पाटण तालुक्यातील काळोली येथील शेतकऱ्यांनी करवसुली साठी आलेल्या अधिका-यांना शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व जागृत शेतक-यांनी चांगलाच हिसका दाखवून रोखून धरत जाब विचारला.

काळोली ता.पाटण येथे आन्यायकारक कोयनाकर वसुलीसाठी व सक्तीने शेती पंप सील करण्यासाठी जलसंपदा विभागातील आधिकारी आले असता शेतकरी संघटनचे पाटण तालुका अध्यक्ष प्रशांत पाटील व बळीराजा शेतकरी संघटनचे प्रमुख बाळासाहेब शिंदे यांचे नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी आक्रमक भुमीका घेत या कारवाईस प्रचंड विरोध केला व कारवाई थांबवन्यास आधिकारयांना भाग पाडले या वेळी पाटणचे तहसीलदार अनंत गुरव व कोयना सिंचण विभागाचे कार्य.अभियंता मोटे याचेशी चर्चा झाली त्यानुसार मंगळवार दिं १२/०३/२०२४ रोजी बैठक घेवुन मार्ग काढणेचे ठरले.

या विषयावर कायमचा मार्ग निघणे गरजेचे आहे, कारवाईची टांगती तलवार आहेच हे विसरू नये यासाठी पाटण तालुक्यातील सर्व परवाना धारक विद्युत पंप धारक शेतकरी व पाणी वापर संस्थाचे पदाधिकरी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्रशांत पाटील यांनी केले आहे.

# सलोनी मोतीबने ठरल्या सौ-भाग्यवती मावळ

## ज्योती विनोदे ठरल्या लकी ड्रॉ मधील दुचाकीच्या मानकरी

**वडगाव मावळ :** कुलस्वामिनी महिला मंच मावळ यांच्या वतीने मावळ तालुक्यातील महिलांसाठी खास सौभाग्यवती मावळ २०२४ हा मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमात गेम शोमधुन प्रथम क्रमांक विजेत्या व मानाची पैठणीच्या मानकरी वडगावच्या सलोनी मोतीबने व लकी ड्रॉ मधील दुचाकीच्या मानकरी ब्राम्हणवाडीच्या ज्योती विनोदे या ठरल्या आहेत.

कामशेत येथील मैदानात आयोजित कार्यक्रमाला महिलांची रेकॉर्ड ब्रेक गर्दी झाली होती.तब्बल चाळीस हजार महिलांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली होती.

मावळ तालुक्याला एक सांस्कृतिक वारसा लाभला असून अशा कार्यक्रमांमुळे महिलांना मनसोक्त वावरण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होते. उपस्थित माता-भगिनींच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून समाधान वाटले,अशी प्रतिक्रिया आयोजिका सारिका शेळके यांनी दिली.



**निस्वार्थ भावनेने मायबाप जनतेची नेहमी सेवा करीत असल्याने माय-माऊलींचा आशीर्वाद मिळत आहे.या आशीर्वादाच्या बळावरच विविध कार्यक्रम दरवर्षी करीत आलो. आजच्या कार्यक्रमात माता-भगिनींना सुखदुःखे विसरुन मनसोक्त आनंद घेता आला,हे पाहून मनाला समाधान वाटले. -**
**आमदार सुनिल शेळके.**

मंचावर गेम शोमध्ये सहभागी झालेल्या महिलांचे विविध खेळ,गप्पा चर्चा व हास्यविनोदात कार्यक्रम संपन्न झाला.मानाची पैठणी प्रथम क्रमांकाचे टू व्हीलर बक्षीस सलोनी मोतीबने यांना मिळाले.तर अक्षदा जगताप दुसरा क्रमांक रेफ्रिजरेटर विजेत्या, तिसरा क्रमांक वॉशिंग मशीन विजेत्या भगीरथी मालपोटे, चौथा क्रमांक टिव्ही विजेत्या दर्शना भालेसेन, पाचवा क्रमांक मोबाईल विजेत्या जयश्री येवले या ठरल्या.आणि लकी ड्रॉ मधील कुपन द्वारे दहा भाग्यवान विजेत्या महिलांना पाच ग्रॅम सोन्याचे देण्यात आले.